
लागवड काळ : पाण्याची उपलब्धता असल्यास १५ अंश सेल्सिअस पेक्षा कमी थंडी चा काळ वगळता कधीही लागवड करता येते. पावसाळ्यात जून व ऑगस्ट आणि उन्हाळ्यात फेब्रुवारी–मार्च या काळात लागवड केल्यास पिकाच्या वाढीसाठी व स्थिरतेसाठी योग्य असते.



या पिकाची लागवड नोव्हेंबर ते जानेवारी हा थंडीचा कालावधी सोडून वर्षभर केव्हाही करता येते. हंगामाप्रमाणे पावसाळ्यात पाऊस नसताना दर १२ ते १५ दिवसांनी, हिवाळ्यात दर १५ ते २० दिवसांनी आणि उन्हाळ्यात दर ७ ते १० दिवसांनी पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. वाढीच्या टप्प्यात पीक तण रहीत ठेवावे. या जातीमध्ये रोग, किडींचा प्रादुर्भाव आढळत नाही.

लागवडीचे अंतर व पद्धत : लागवड ठोंब (मुळासह काड्या) लावून करावी. ठोंब उपलब्ध नसल्यास साधारणपणे ३ महिने वाढलेल्या पिकाच्या खोडाच्या जमिनीकडील २/३ भागातील कांड्या लावाव्यात. दोन डोळे असणाऱ्या कांड्या चांगल्या फुटतात. ठोंब / दोन डोळे कांडी ३ फूट अंतरावर काढलेल्या सरीच्या बगलेत, एक डोळा जमिनीत व एक डोळा जमिनीच्यावर राहील अशा रीतीने लावाव्यात. दोन कांडीमधील अंतर साधारणतः २ ते ३ फूट ठेवावे. ट्रॅक्टरचे साहाय्याने आंतरमशागत करणार असाल तर सरी मधील अंतर ४ फूट ठेवावे.

खत व्यवस्थापन : लागवडीच्या वेळी पिकाला प्रति हेक्टरी ५०० किलो नत्र (१०० किलो युरिया) ५० किलो स्फुरद (३०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट) आणि ५० किलो पालाश (साधारण ८० किलो म्युरेट ऑफ पोटॅश) खताची मात्रा द्यावी. प्रत्येक कापणी नंतर २५ किलो नत्र (५० किलो युरिया) या खताची मात्रा द्यावी.

पाणी व्यवस्थापन : हिवाळ्यात पिकाला १५ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. उन्हाळ्यात ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देणे आवश्यक आहे. पावसाळ्यात पावसाच्या दिवसात खंड पडल्यास संरक्षित पाण्याची व्यवस्था करावी. पाण्याचा ताण पडल्यास गवताच्या उत्पादनावर परिणाम होतो.

आंतर मशागत : सुरूवातीच्या वाढीच्या काळात एक किंवा दोन खुरपण्या करणे आवश्यक आहे. त्यानंतर गरजेनुसार खुरपणी किंवा निंदणी करावी.

दरवर्षी हिवाळ्यात डिसेंबर किंवा जानेवारीमध्ये सऱ्या मोडून हेक्टरी १० टन शेणखत आणि ७५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश यांची मात्रा देऊन रान बांधणी करून पाणी द्यावे म्हणजे फेब्रुवारी पासून जसजसे तापमान वाढेल तसतशी पिकाची जोमदार वाढ होते.

कापणी : या पिकाची पहिली कापणी लागवडीनंतर ७५ दिवसांनी करावी. त्यानंतरच्या कापण्या ५० ते ५५ दिवसांच्या अंतराने कराव्यात. वर्षभरात एकूण ६ ते ८ कापण्या मिळतात. या पिकाची कापणी वेळेत करावी, अन्यथा चारा जाड, टणक होऊन पिकातील पोषणमूल्ये कमी होतात. चाऱ्याचे उत्पादन कमी होते. कापणी जमिनीपासून साधारण १५ ते २० सेंमी (अर्धा फूट) उंचीवर केल्यास फुटवे फुटण्यास चांगली मदत होते.

उत्पादन : संकरित नेपियर या गवतापासून हिरव्या चाऱ्याचे सरासरी प्रति हेक्टरी उत्पादन १५०–२०० मे. टनापर्यंत मिळते.

संकलन
डॉ. सुहास अमृतकर आणि डॉ. विठ्ठल मुंडे
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय
परभणी

मपमविवि/वि.शि.सं./प्रकाशने/२३/२०२३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

संकरित नेपियर द्वारे जनावरांकरिता वर्षभर हिरव्या चाऱ्याचा पुरवठा



प्रकाशक
विस्तार शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ
फुटाळा तलाव मार्ग, नागपूर – ४४०००१
टोल फ्री क्रमांक – १८००–२३३–३२६८
संकेतस्थळ – www.mafsu.in

हिरव्या चाऱ्याच्या उपलब्धतेची तूट भरून काढण्यासाठी जास्त उत्पादन देणाऱ्या, पौष्टिक तसेच बहुकापणी आणि बहुवार्षिक चाऱ्याच्या जातींची लागवड फायदेशीर ठरते. संकरित नेपियर हे बहुवार्षिक गवत बाजरी आणि नेपियर यांच्या संकरातून निर्माण केलेले भरपूर उत्पादनक्षम चारापीक आहे. यात बाजरीतील अधिक प्रथिने आणि नेपियर मधील अधिक उत्पादन क्षमतेचा गुणधर्म आणण्यात आले आहेत. संकरित नेपियर हे जलदगतीने २ ते ३ मीटर उंच वाढणारे व कमीत कमी २० ते २५ फुटवे देणारे चारापीक आहे. या पिकात प्रथिनांचे प्रमाण सरासरी १० ते ११% आहे . या उत्तम प्रतीच्या चारा पिकाची एकदा लागवड केल्यानंतर ३ ते ४ वर्षे जनावरांना हिरवा चारा उपलब्ध होतो. तसेच त्यापसून मुरघास ही बनविता येतो.

बहुवार्षिक गवतांच्या जातीमध्ये संकरित नेपियर गवताला का प्राधान्य द्यावे?

१. उत्तम पोषणमुल्य
२. कुठल्याही वातावरणाशी जुळवून घेण्याची उत्तम क्षमता
३. कुठल्याही चारापिकांपेक्षा वार्षिक चाऱ्याचे उत्पादन जास्त
४. लागवडीचा खर्च कमी
५. कीड/कीटक रोगांचा अत्यल्प प्रादुर्भाव
६. वन्यप्राण्यांपासून अत्यल्प नुकसान
७. बेण्यापासून उत्तम लागवड
८. खत आणि सिंचनास उत्तम प्रतिसाद

जनावरांच्या समतोल आहारामध्ये वाळलेली वैरण, हिरवा चारा, आंबवण, खनिज पदार्थ, जीवनसत्त्वे, पाणी यांचा समावेश होतो. त्यात सुमारे ७० टक्के भाग हा हिरवा चारा असतो. त्यामुळे लुसलुशीत व पौष्टिक चाऱ्याचे नियोजन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यासाठी संकरित नेपिअर हे बहुवार्षिक गवत महत्त्वाचे ठरते.

महाराष्ट्रात लागवड योग्य जाती

१) बायफ संकरित नेपियर-११ : बायफ डेव्हलपमेंट रिसर्च फाउंडेशन मधील कृषी तज्ज्ञांनी बाजरी आणि हत्ती गवत यांच्या संकरापासून बायफ संकरित नेपियर-११ (बी.एन.एच. ११) या संकरित नेपियर गवताची जात विकसित केली आहे. यास कुस विरहित, मऊ, रसाळ, जाड रसदार व भरपूर पालेदार ताटे असतात. कापणी केल्यानंतर जोमदार फूट येते.

चाऱ्यामध्ये ७ ते ८ टक्के प्रथिने, २२ ते २५ टक्के शुष्कपदार्थ, एकूण पचनीय घटक ५५ ते ६० टक्के असतात. वर्षभरात ६ ते ८ कापण्यापासून प्रति हेक्टरी १८० ते २०० टन हिरव्या चाऱ्याचे उत्पादन मिळते.

२) फुले गुणवंत : महात्मा फुले कृषी विद्यापीठ विकसित या चारा जातीमध्ये ऑक्झिलिक आम्ल अल्प प्रमाणात - २.०५%, लिग्निन - ६.३% व प्रथिने अधिक प्रमाणात -९.१०%, कापणी नंतर जोमाने वाढणारी जात, भरपूर फुटवे, मऊ लांब व रुंद पाते, चारा पालेदार, हिरवागार, रसदार, रूचकर असतो.

उत्पादन ५००-६०० क्विंटल / एकर / वर्ष



३) संपूर्णा (डीएचएन-६), (डीएचएन-१०) : भारतीय चारा संशोधन संस्थेअंतर्गत प्रादेशिक संशोधन केंद्र, धारवाड येथे विकसित या चारा जातीमध्ये ऑक्झिलिक आम्लाचे प्रमाण १.९% व प्रथिनांचे ११% आहे. कापणी नंतर जोमाने वाढते. फुटव्यांची संख्या २५ प्रति ठोंब. गोडवा जास्त प्रमाणात, चारा पालेदार, रसदार व रूचकर असतो.

उत्पादन १२०-१५० टन / हेक्टर , ६ ते ८ कापणीत

४) फुले जयवंत : महात्मा फुले कृषी विद्यापीठामधील कृषी तज्ज्ञांनी जायंट बाजरा व नेपियर यांच्या संकरातून फुले जयवंत या संकरित नेपियर गवताची जात विकसित केली आहे. ऑक्झिलिक आम्लाचे प्रमाण कमी आणि प्रथिने १०.१५% असते.

उत्पादन-हेक्टरी १४० मे. टन मिळते.



मशागत आणि लागवड

जमीन : संकरित नेपियर चारा पिकाची लागवड उत्तम पाण्याचा निचरा होणाऱ्या जमिनीत करावी. दलदल, पाणथळ किंवा निचरा न होणाऱ्या जमिनीत लागवड केल्यास पिकाची वाढ खुंटते. हलकी व मध्यम जमीन उपयुक्त , भारी जमिनीत लागवड करू नये. सेंद्रिय पदार्थाचे प्रमाण जास्त असलेल्या जमिनीत उत्पादन जास्त मिळते. जमिनीचा सामू ५.५ ते ६.० दरम्यान असावा.

हवामान : उष्ण कटिबंधातील उष्ण व कोरडे हवामान या पिकाला मानवते. जास्त पर्जन्यमानाच्या (२५०० मि.मी. पेक्षा जास्त) प्रदेशात या पिकाची वाढ चांगली होत नाही. योग्य वाढीकरिता ३१ अंश सेल्सिअस तापमान आवश्यक असते.

पूर्वमशागत : प्रथम उभी-आडवी खोल नांगरणी करून कुळवाच्या २ पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. शेवटच्या कोळपणीच्या वेळी हेक्टरी ८ ते १० टन कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. त्यानंतर लागवडीसाठी सरी वरंबा तयार करावी.